राज्य अग्निशमन केंद्रात सब-ऑफिसर्स पाठयक्रम सुरु करणे व अग्निशमन सेवेतील नवीन नियुक्तीसाठी उमेदवारांची शैक्षणिक पात्रता किमान इयत्ता १० उत्तीर्ण व इतर अटी असणेबाबत..

## महाराष्ट्र शासन
### नगर विकास विभाग,

शासन निर्णय क्रमांक :एफएफएस १६२००३/७०७/प्र.क्र.७८/२००३/नवि-६
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक २४ जून, २००४

संदर्भ :-अग्निशमन सल्लागार, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्रमांक ३५९/अस/मशा/-२००३/ सीआर-७५, दिनांक १४.०८.२००३

<u>प्रस्तावना</u> :- राज्यमंत्री, नगर विकास विभाग यांच्या अध्यक्षतेखाली राज्य अग्निशमन सल्लागार समितीच्या दिनांक ९ मे, २००३ रोजी झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने व अग्निशमन सल्लागार, महाराष्ट्र शासन यांच्या वरील पत्रानुसार राज्यातील अग्निशमन सेवेचे कार्य प्रामुख्याने महानगरपालिका/नगरपरिषदा, शासकिय उपक्रमे इत्यादी यांचेमार्फत चालविले जाते. अग्निशमन सेवेतील अग्निशामक पदासाठी सध्या किमान इयत्ता ७ वी उत्तीर्ण शैक्षणिक पात्रता आहे. केंद्रीय गृह मंत्रालयाच्या स्थायी अग्निशमन सल्लागार समितीने व राज्य अग्निशमन सल्लागार समितीने अग्निशामकाच्या सेवेचा दर्जा वाढविण्यासाठी किमान शैक्षणिक पात्रता १० वी उत्तीर्ण असल्यास अग्निशामकाच्या सब ऑफिसर्स पाठयक्रम प्रवेशाच्या शिफारशी पाठवितांना अडचणी येणार नाहीत . पयार्याने अग्निशामकांची सब-ऑफिसर्स पाठयक्रम पूर्ण केल्याने त्यांच्या शैक्षणिक पात्रतेत वाढ होवून सेवेचा दर्जा वाढेल व भविष्यातील पदोन्नतीपासून ते वंचित राहणार नाहीत. त्यामुळे राज्यातील महानगरपालिका/नगरपरिषदा, शासकिय उपक्रमे इत्यादीच्या अग्निशमन सेवेतील अग्निशामक या पदावरील नवीन नियुक्तीसाठी किमान १० वी उत्तीर्ण व राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्राचा अग्निशामक प्रशिक्षण पाठयक्रम पूर्ण करण्याची अट सेवा नियमात अंतर्भूत करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

<u>शासन निर्णय</u> :- केंद्रीय गृह मंत्रालयाच्या स्थायी अग्निशमन सल्लागार समितीची शिफारस व राज्य अग्निशमन सल्लागार समितीच्या वरील शिफारशीच्या अनुषंगाने राज्यातील महानगरपालिका/नगरपरिषदा, शासकिय उपक्रमे, इत्यादींच्या अग्निशमन सेवेतील अग्निशामक या पदावरील नवीन नियुक्तीसाठी यापुढे किमान शैक्षणिक पात्रता इयत्ता १० वी उत्तीर्ण असेल व संबधित उमेदवारांनी राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्राचा अग्निशामक पाठयक्रम पूर्ण केलेला असावा. सर्व महानगरपालिका/नगरपरिषदा,

शासकिय उपक्रमे इत्यादींनी अग्निशामक पदाच्या सेवा नियमात वरील आदेशाच्या अनुषंगाने आवश्यक ते बदल करावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(म.दि.आडिवरेकर)
महाराष्ट्र शासनाचे उपसचिव

प्रति,
अग्निशमन सल्लागार, महाराष्ट्र शासन, राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, सांताक्रुझ-पूर्व मुंबई
सर्व विभागिय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
संचालक नगरपालिका प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई-४०० ०२५
आयुक्त, सर्व महानगरपालिका
मुख्याधिकारी, सर्व नगर परिषदा
गृह विभाग,
निवडनस्ती (नवि-६) नगर विकास विभाग